# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/प्रवेश २०१८-१९/२०१८/ २५६९ दिनांक : २१.०६.२०१८.

**परिपत्रक / महत्वाचे :**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानीत
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांकडून ५० टक्के शुल्काची रक्कम न घेणेबाबत...**

**संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग संक२०१८/प्र.क्र. २३७/तांशि-४, दिनांक २०.६.२०१८.**
**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१८/७९९ दि. २०.०६.२०१८**

या विभागीय सर्व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४२ मधील तरतूदीस अनुसरून संस्थानी विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत उपरोक्त पत्र प्राप्त झाले असून. त्या अनुषंगाने,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नव्याने प्रवेश घेणा-या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेस पात्र विद्यार्थ्यांकडून, संस्थेत यापूर्वी प्रवेशित असलेल्यांमधील सदर योजनेचा लाभ घेत असलेले तसेच सदर योजनेस नव्याने पात्र असणारे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नियमित शिक्षण घेत असल्यास अशा विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये. सदर विद्यार्थ्यांकडून या योजनेचा अर्ज करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

**प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्केपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात येईल.**

सोबत संदर्भाधिन पत्रांच्या छायांकीत प्रती जोडल्या असून, सर्व संस्थांनी उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४२ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी (कार्यासन क्र. २अ / १८)

D:\Yogesh Kelkar\Admission 18-19\Circular of charging 50% Fees for EBC.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स – 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/७९९
दिनांक : 20 JUN 2018

**विषय :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
**योजनेसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांकडून ५० टक्के शुल्काची रक्कम न घेणेबाबत...**

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४,दिनांक २०.६.२०१८

राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, ,शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४,दिनांक ७.१०.२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४२ मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत:-

" तथापि,उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणा-या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरूपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास वरीलप्रमाणे DBT द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/तंत्रनिकेतनास शुल्कापोटी तत्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये.

**प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्केपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात येईल.**

**उपरोक्त तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : महाराष्ट्र राज्यातील सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे प्राचार्य, त्यांना कळविण्यात येते की, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

प्रत : सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर- त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाची अंमलबजावणी आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

प्रत: कार्यासन क्र. १८ मुख्य कार्यालय यांना माहितीसाठी.

E:\Budage\2018-19\General Correspondence\circular regarding scholarship and ebc gr.docx

**महाराष्ट्र शासन**

तातडीचे

क्रमांक-संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४०९३५
दिनांक : २० जून,२०१८

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ५० टक्के शुल्काची
रक्कम न घेणेबाबत.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ३३२/ तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४२ मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत :-

"तथापि, उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास वरीलप्रमाणे DBT व्दारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/ तंत्रनिकेतनास शुल्कापोटी

तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल." उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये, अशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित संस्थांना तात्काळ द्याव्यात.

३. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून विहित शिक्षण शुल्काच्या ५० टक्के पेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात यावी.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन